भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २०८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०४/२०१८

**१) पैश्याची चोरी :–**

दिनांक १९/०४/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील लक्ष हॉस्पीटल भंडारा येथील डॉ. जया यांचे चेंबर मधुन दि. १९/०४/२०१८ ला कॅबीन उघडे असतांनी कोणतरी अज्ञात चोराने कॅबिनमध्ये प्रवेश करून टेबल मध्ये ठेवलेला लिफापा त्यात ९१,२००/रु. चे पॉकीट टेबल वरून चोरून नेल्याने, फिर्यादी डॉ. गोपाल व्यास वय ४३र्ष रा. तकीया वार्ड भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) सोन्या–चांदीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी:–**

दिनांक ०४/०४/२०१८ चे १२.०० ते दि. २१/०४/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे परीवारासह दि. ०४/०४/२०१८ चे १२.०० वाजता घराला ताला लावुन त्यांची मोठी मुलगी रा. नागपुर हीचे कडे भेटायला गेले असता, नागपूरला मुलीजवळ हजर असतांना दि. २१/०४/२०१८ ला १३.०० वा. दरम्यान भाचा रत्नदीप परमानंद भालेराव याने फोन करून सांगितल्याने फिर्यादी दि. २१/०४/२०१८ चे १६.०० वा. येवुन घरात पाहीले असता, त्याचे घराचे मुख्य दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून लॉकर मध्ये ठेवलेले चांदीच्या तोरडया ५ तोडे, लहान मुलाच्या सोन्याच्या बारमुन्दया २ ग्रॅम, २ चिनी मातीचे गल्ले दोन्ही फोडुन त्यातील नगदी १२,००/रु. असा एकुन ९,२००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी शिवराज ईस्तारी गणवीर वय ६५ वर्ष रा. आंबेडकर वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २१/०४/२०१८ चे १६.१५ ते १६:३५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील महिद्रा मॅक्स वाहन ही भिलेवाडा टोल नाका येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करुन मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. भुरले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भरले पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

**४) मृत अवस्थेत महिला मिळुन आल्याने मर्ग नोंद :–**

दिंनाक २४/०४/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक पोर्णीमा सोनी राधेश्याम खोब्रागडे वय ३० वर्ष, रा. खातरोड ही आपल्या कमऱ्या मध्ये मृत अवस्थेत मिळुन आल्याने, फिर्यादी नेपाल गोमाजी खोब्रागडे वय ६२ वर्ष रा. आंधळगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत

**५) विहीरीत तरूनाचे प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोंद:–**

दिंनाक १७/०४/२०१८ चे १३.०० ते २०/०४/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील मृतक जितेन्द्र नंदलाल घोनाडे वय २२ वर्ष, रा. राजापुर हा १७/०४/२०१८ रोजी १३.०० वा. सुमारास कामावरून काही न सांगता निघुन गेला होता दि. २०/०४/२०१८ रोजी १७.३० वा. दरम्यान मृतक हा राजापुर शेत–शिवारातील विहीरीत मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी सौ. सरस्वती श्रिराम राऊत वय ६० वर्ष रा. राजापुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी.झोटींग पोलीस स्टेशन गोबरवाही करीत आहेत

**६) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक २१/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, मोहाडी, कारधा, करडी, वरठी, तुमसर, सिहोरा,आंधळगाव,लाखनी, साकोली,पालांदुर, पवनी, अडयाळ व लाखांदुर येथे अवैध हातभट्टी +देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ३८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १६१६ लिटर हातभंट्टी दारू + १४७६० किलो सडवा मोहा+ साहित्य+१ मोटार सायकल किंमती ११,७१,६२५/रु. व ३८ लिटर ६१० मिली लिटर देशी/विदेशी दारु किंमती १४००१/–रु. तसेच जुगारातुन ५०,२९६/रु. असा एकुण किंमती १२,३५,९२२/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २१/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०३ तीन सिटर वाहनाकरीता– ०७ ईतर वाहनांवरती – १०८ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
महिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.